अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील उपसंचालक (गट-अ) पदावरील अधिका-यांना सहसंचालक (गट-अ) या संवर्गातील पदावर पदोन्नतीने नियुक्ती.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन आदेश क्रमांकः पदोनि-१११ १/प्र.क्र.२३२/का-१४२७
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
विस्तार इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १४ जानेवारी, २०१६.

शासन आदेश

अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई यांच्या आस्थापनेवरील उपसंचालक, गट-"अ" या संवर्गातील अधिकाऱ्यांना सहसंचालक पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्याबाबत दि. १५ जानेवारी, २०१३ रोजी विभागीय पदोन्नती समितीची बैठक झाली. त्यात श्री. वि. कृ. आहेर, तत्कालीन उपसंचालक यांचे प्रकरण सन २०११-१२ च्या गोपनीय अहवालाअभावी खुले ठेवण्यात आले होते. तद्नंतर दि. १६ जून, २०१४ रोजी झालेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत श्री. आहेर यांचे उपरोक्त गोपनीय अहवाल प्राप्त झाल्याने विभागीय पदोन्नती समितीने त्यांना सहसंचालक पदावर पदोन्नतीस पात्र ठरविले. दरम्यान श्री. आहेर यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे सहसंचालक संवर्गात नामनिर्देशनाद्वारे झालेली नियुक्ती, सन २०१३ च्या तात्पुरत्या पदोन्नती निवडसूचीमधील खुले ठेवण्यात आलेल्या प्रकरणी होणाऱ्या निर्णयाच्या अधिन राहून स्विकारली होती. तसेच दि. १५ जून, २०१५ च्या अर्जान्वये श्री. आहेर यांनी आपल्या नावाचा सन २०१३ च्या निवडसूचीत समावेश करुन पदोन्नती देण्याची विनंती केली. या अर्जासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाशी विचारविनिमय करुन श्री. आहेर यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. श्री. वि. कृ. आहेर, तत्कालीन उपसंचालक यांना सहसंचालक गट-अ (वेतनसंरचना, वेतन बॅड रु.१५,६००-३९१०० + ग्रेड वेतन रु. ६,६००) या पदावर खालील परिच्छेद-२ येथे नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून त्यांच्या नावासमोर स्तंभ ६ मध्ये दर्शविलेल्या पदावर ते त्या पदाचा पदभार स्वीकारतील त्या दिनांकापासून ११ महिन्यांच्या कालावधीपर्यन्त किंवा नियमित अधिकारी उपलब्ध होईपर्यन्त तदर्थ स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.

अ. क्र.	उपसंचालकांचे नांव, सध्याचे पदनाम	प्रवर्ग	बंधपत्रानुसार मागितलेला विभागीय संवर्ग	विभागाने वाटप केलेला विभागीय संवर्ग	पदोन्नतीनंतर पदस्थापना करण्यात आली ते पद व कार्यालय
१	२	३	४	५	६
१.	श्री. वि. कृ. आहेर, उपसंचालक	अजा	औरंगाबाद	औरंगाबाद	उपायुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद.

२. सदर पदोन्नती खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून देण्यात येत आहेत :-

१) सदर आदेशानुसार पदोन्नतीच्या पदाचा पदभार स्वीकारावा व तसे केल्याबद्दलचे कार्यभार हस्तांतर प्रमाणपत्र शासनास सादर करण्यात यावे व त्याची एक प्रत संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई यांना अग्रेषित करावी.पदोन्नती स्वीकारावयाची नसल्यास तसे लेखी स्वरुपात शासनास कळवावे.

२) सदर पदोन्नतीचे आदेश प्राप्त झाल्यापासून संबंधीत अधिका-यांना शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करु नये.

३) पदस्थापनेत बदल करण्याकरिता कोणत्याही स्वरुपात राजकीय दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास ही बाब गंभीर ठरवून शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येईल.

४) पदोन्नती आदेश प्राप्त झाल्यानंतर पदोन्नती स्वीकारली नाही किंवा विविध सबबीखाली पदस्थापना स्वीकारण्यास टाळाटाळ केल्यास आश्वासित प्रगती योजनेंतर्गत जर लाभ देण्यात आले असतील तर ते लाभ काढून घेण्यात येतील.

५) पदोन्नतीनंतर संबंधीत उपसंचालक पदोन्नतीच्या पदावर रुजू न झाल्यास त्यांना पदोन्नतीबाबत स्वारस्य नसल्याचे समजून सामान्य प्रशासन विभागाच्या स्थायी आदेशानुसार निवडसूचीतून त्यांचे नांव वगळण्यात येईल. तद्नंतर कोणत्याही परिस्थितीत त्यांची विनंती मान्य करता येणार नाही.

६) संबंधीत कार्यालय प्रमुखांनी संबंधीत अधिका-यांच्या पदाचा पदभार अन्य अधिका-यांकडे सोपवून त्या अधिका-यांना पदोन्नतीच्या पदावर रुजू होण्याकरिता तात्काळ कार्यमुक्त करावे. व ज्या पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आलेली आहे त्या पदावर त्यांना संबंधीत कार्यालय प्रमुखांनी रुजू करुन घ्यावे. एखादया कार्यालयाने रुजू करुन घेण्यास टाळाटाळ केल्यास व सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी नियमित करण्याचा प्रश्न उद्भवल्यास कोणत्याही परिस्थितीत सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी नियमित करता येणार नाही. या संदर्भात वित्त विभागाच्या शासन निर्णय, क्रमांक: सेनिवे-१००१/१३०/ सेवा-४, दि.२.०६.२००३ मधील परिशिष्ट-१, नियम क्र.९ (१४) (एफ) शेरा क्र.२ नुसार सक्तीचा प्रतिक्षा कालावधी निर्माण होण्यास जबाबदार ठरणा-या संबंधित अधिका-यावर जबाबदारी निश्चित करण्यात येईल.

७) या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे उपरोक्त अधिकारी नियमित पदोन्नतीसाठी पात्र आहेत असा या पदोन्नतीचा अर्थ होणार नाही व या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे त्यांना नियमित पदोन्नतीचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

८) सदर पदोन्नती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून देण्यात येत आहेत.

९) सदर पदोन्नती स्वीकारल्यामुळे त्यांची या विभागाच्या शासन आदेश क्र.आरटीपी-१७११/प्र.क्र.२३२/का.१४२७,दि. १४ जून, २०१३ अन्वये नामनिर्देशनाने सहसंचालक पदावर केलेली नियुक्ती आपोआप रद्द होईल.

१०) सदर पदोन्नती ही दिनांक १६/०६/२०१४ रोजी झालेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीतील निर्णयानुसार देण्यात येत आहे.

५. सदरहू आदेश हे सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्र. ११०३/१३,दि.१३/०७/२०१५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११४१५४४५४०४१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay Kashinath Gambre

Digitally signed by Sanjay Kashinath Gambre
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Sanjay Kashinath Gambre
Date: 2016.01.14 17:12:26 +05'30'

(सं. का. गंब्रे)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ व २, मुंबई/नागपूर,
२. महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१ व २, मुंबई/नागपूर,
३. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.मंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. राज्यमंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),
७. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे/औरंगाबाद
८. सर्व सह सचिव/उप सचिव/विशेष कार्य अधिकारी, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई
१०.उपायुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, नागपूर/अमरावती/ औरंगाबाद/ नाशिक/पुणे/कोकण *
११.सर्व सहसंचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रादेशिक कार्यालय,
१२.सामान्य प्रशासन विभाग (का.१२/का.१६ ब), मंत्रालय, मुंबई,
१३.अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक,
१४.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१५.जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, पुणे/औरंगाबाद
१६.सर्व जिल्हा नियोजन अधिकारी , जिल्हा नियोजन समिती,
१७.सर्व जिल्हा सांख्यिकी अधिकारी, जिल्हा सांख्यिकी कार्यालय,
१८.श्री. वि. कृ. आहेर, उपायुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे
१९.निवडनस्ती, कार्यासन १४२७, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.